'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू


पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

### १३०० कोटींचा जमीन घोटाळा?


**मुंबई :** मुंबईमधील मोक्याच्या ठिकाणी असलेला भूखंड आता धारावीच्या पुनर्विकासाच्या नावाखाली कवडीमोल दरात अदानी समुहाला दिला जात असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील तब्बल १३०० कोटी रुपये किंमत असलेली जमीन अदानी समुहाला अवघ्या ५७ कोटी ८६ लाखांमध्ये देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा आरोप 'आपली लोक चळवळी'ने केला आहे. या प्रकरणी न्यायालयात धाव घेण्याची तयारी असल्याचं सांगण्यात आलं आहे.

✻ वर्ष २ रे ✻ अंक ३९ वा ✻ रविवार दि. २९ जून २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**




**कमळकाचा**
: लेखकाचे नाव :
सुमती लांडे
किंमत रु. : ३९०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**डेड एण्ड**
: लेखकाचे नाव :
पंकज कुरुलकर
किंमत रु. : ४५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# हिंदीविरोधात ठाकरे बंधू भव्य मोर्चा काढणार

## राज ठाकरे अन् उद्धव ठाकरेंनी 'शिलेदार' ठरवली । राष्ट्रवादी पक्षाचाही जाहीर पाठींबा

**मुंबई :** हिंदीच्या मुद्द्याविरोधात ठाकरेंची शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोन्ही पक्षाचा एकत्र मोर्चा ५ जुलैला आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्रित मोर्चा काढणार आहेत. या मोर्चाच्या तयारीला आता वेग आला आहे. मोर्चाचा मार्ग त्यासोबतच मोर्चाची वेळ यासंबंधी निर्णय लवकरच होणार आहे. मोर्चा यशस्वी करण्यासाठी दोन्ही नेत्यांच्या चर्चा भेटीगाठी आता सुरू झाल्या आहेत. यानंतर आता दोन्ही पक्षांच्या काही नेत्यांवर या मोर्चाच्या नियोजनाची जबाबदारी सोपवण्यात आली.



ठाकरेंची शिवसेना आणि मनसे दोन्ही पक्षाकडून पाच जुलैचा मोर्चा यशस्वी आणि भव्य करण्यासाठी तयारी सुरू करण्यात आली आहे. मुंबईतील विविध विभागात पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन मोर्चाची रणनीती दोन्ही पक्षाकडून ठरवली जाणार आहे. मनसेकडून संदीप देशपांडे, बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून संजय राऊत, वरुण सरदेसाई, व इतर काही नेते नियोजनाची आणि तयारीची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मोर्चाची वेळ आणि आझाद मैदानावरील मोर्चाचा मार्ग यासंबंधी चर्चा दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये सुरू आहे.

हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्राच्या विरोधातील उद्याची मुंबईतील सभा आणि या शासन निर्णयाची होळी करून निषेध करण्याला सध्या प्राधान्य दिला आहे. उद्या (२९ जून) मुंबईतील विविध विभागांमध्ये त्रिभाषा सूत्राच्या सक्तीच्या शासन निर्णयाची होळी दुपारी ठिकठिकाणी करून निषेध व्यक्त केला जाणार आहे. दादरमधील प्रबोधनकार ठाकरे चौक येथे तर बांद्राच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासन निर्णयाची होळी करत निषेध व्यक्त केला जाणार आहे. (पान २ वर)

### अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळही सक्रिय सहभाग घेणार

५ जुलै रोजी होणाऱ्या भव्य मोर्चात आता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळही सक्रिय सहभाग घेणार आहे. महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी ही माहिती दिली असून, साहित्य संस्था, मराठी साहित्यिक, अभ्यासक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कितीही आपटा आपट केली किंवा तसे प्रयत्न केले तरी मराठी माणसाची एकजूट तुटणार नसल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

**- खा. संजय राऊत**

### उद्धव आणि राज मोर्चाचं नेतृत्व करणार

दोघे ठाकरे बंधू मोर्चासाठी एकत्र येतायत याचा सगळ्यांना आनंद आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येऊन मोर्चाचं नेतृत्व करतील, असंही संजय राऊतांनी सांगितले. मुंबईवर मराठी माणसांचा झेंडा फडकवायचा असेल तर बाळासाहेबांचे विचार पाळावे लागतील. मराठी शक्तींनी एकत्र यावं, असं आवाहन संजय राऊतांनी केलं. तसेच याआधी मनसे-शिवसेना नेते एकमेकांना भेटत नव्हते. रस्ते बदलायचे. आता मराठीसाठी एकत्र येतायत, असंही संजय राऊतांनी सांगितले.



भाषा शिक्षण हा केवळ राजकीय विषय नाही, तर अत्यंत महत्त्वाचा सामाजिक व शैक्षणिक विषय आहे. भाषेसंदर्भात जे जाणकार आणि तज्ज्ञ आहेत, त्यांचे मत, माहिती आणि विचार जाणून घेणे आवश्यक आहे. हा विषय केवळ राजकारण म्हणून हाताळणे योग्य नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हिंदी सक्तीविरोधात निघणाऱ्या मोर्चामध्ये पूर्ण ताकदीने सहभागी होणार आहे. आमच्या पक्षाकडून 'मराठीसाठी' मोर्चात कोण सहभागी होईल, हे आज-उद्या निश्चित होईल.

**- खा. सुप्रिया सुळे**

## अजित पवारांच्या निलकंठेश्वर पॅनेलला एकहाती सत्ता

**बारामती :** माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील श्री निलकंठेश्वर पॅनेलने एकहाती सत्ता मिळविली. ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे, रंजन ताबरे यांच्या सहकार बचाव शेतकरी पॅनेलचा धुव्वा उडाला. राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाचा बळीराजा सहकार बचाव पॅनेल आणि शेतकरी कष्टकरी समितीच्या पॅनेलला तर सभासदांनी सपशेल नाकारले. बुधवारी सायंकाळी हाती आलेल्या निकालानुसार पवार यांच्या पॅनेलला २१ पैकी २० तर सहकार बचावला तावरे यांच्या रुपाने एक जागा पदरी पडली. (पान २ वर)

## शक्तीपीठ महामार्गासाठीच्या भूसंपादनाला मंजुरी

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाने बहुचर्चित शक्तीपीठ महामार्गासाठीच्या भूसंपादनाला मंजुरी दिली होती. यामुळे या महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग येईल, असे वाटत असतानाच या प्रक्रियेमुळे महाराष्ट्र कर्जबाजारी होईल असा अहवाल वित्त विभागाने दिला आहे.

शक्तीपीठ महामार्ग उभारण्यासाठी जो पैसा लागणार आहे, त्यामुळे राज्य सरकारच्या डोक्यावरील कर्जाचा बोझा प्रचंड वाढेल. अर्थमंत्री अजित पवार यांच्या अखत्यारित येणाऱ्या वित्त विभागाचा शक्तीपीठ महामार्गा संदर्भातील हा अहवाल आणि त्याचे टायमिंग सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

शक्तीपीठ प्रकल्पासाठी राज्याचे २०,७८७ कोटी रुपयांचे उच्च आर्थिक दायित्व




आहे. परिणामी अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, मार्च २०२६ पर्यंत राज्य सरकारवर ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्जाचे ओझे येणार असल्याचा अभिप्राय या अहवालात नोंदवण्यात आला आहे.

प्रस्तावित नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र मंत्रिमंडळाने वाढवलेल्या २०.७८७ कोटी रुपयांच्या कर्ज हमीमुळे राज्यावर आर्थिक भार पडेल आणि बजेट बाहेरील कर्जाचा राज्याच्या कर्ज घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल, अस मंगळवारी अर्थ विभागाने सादर केलेल्या नोटमध्ये म्हटले आहे. (पान २ वर)

### संक्षिप्त

### ठाकरेंचा मोर्चा मी निघू देणार नाही : गुणरत्न सदावर्ते

**मुंबई ।** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा मोर्चा म्हणजे ठणठण गोपाला आहे. हा मोर्चा मी निघू देणार नाही, असे म्हणत गुणरत्न सदावर्ते यांनी इशारा दिला आहे. राज ठाकरेंनी मोर्चाची घोषणा केल्यापासूनच सदावर्तेंनी मोर्चाला विरोध दर्शवला आहे. जे नियम सर्वसामान्यांना आहेत, तेच नियम यांनाही लागू असले पाहिजे. मुख्यमंत्री 'देवेंद्र फडणवीस राज ठाकरे यांना भेटतात, यावर मला बोलायच नाही. पण, ठाकरे यांचा मोर्चा म्हणजे बाळगोपाळाचा मोर्चा आहे, 'हिंदी रोखणं म्हणजे मुलांचं शिक्षण खेळण्यासारखं आहे, असेही सदावर्तेंनी म्हटलं आहे.

## घरगुती वीजदर २६ टक्के कमी होणार

**मुंबई :** महाराष्ट्रातील घरगुती वीजदर येत्या पाच वर्षात टप्प्याटप्प्याने तब्बल २६टक्के कमी होणार आहे. पहिल्याच वर्षी १० टक्क्याने दर घसरणार असल्याची माहिती मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने यासंदर्भात निकाल दिला. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ऊर्जा खात्याचा कारभार आहे.



बळीराजाला दिवसा आणि खात्रीचा वीजपुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे काम युद्धपातळीवर सुरु आहे. सोबतच आगामी काळात वीजखरेदी करारांमध्ये हरितऊर्जे वर मोठ्या प्रमाणात भर दिल्यामुळे वीजखरेदी खर्चात बचत होणार आहे. त्यामुळेच हा दर कमी करण्याचा प्रस्ताव महावितरणला मांडता आला. ही बातमी राज्यातील जनतेला देताना मला आनंद होतो आहे.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

याआधीच्या सरकार काळात भरमसाठ (पान २ वर)

## संविधानातून समाजवादी - धर्मनिरपेक्ष शब्द हटवा

**मुंबई :** संविधानाच्या प्रस्तावनेत असणारे समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द हटविण्यात यावेत, अशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी मांडली आहे. होसबाळे यांच्या भूमिकेतून भाजप आणि संघाचा संविधान बदलाचा छुपा अजेंडा असल्याची टीका विरोधकांनी केली आहे.

## तिसरीपासून हिंदीची पुस्तके : दादा भुसे

**पुणे :** राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सुत्रीवरुन सुरू असलेल्या वादासंदर्भात शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची भेट घेऊन त्यांना सरकारची भूमिका समजावून सांगितली. मात्र, आपल्याला सरकारची भूमिका मान्य नाही, शाळेत पहिलीपासून तिसरी भाषा देण्यास आमचा विरोध असल्याचे राज ठाकरेंनी



स्पष्ट केले, त्यानंतर, आता दादा भुसेनी पत्रकार परिषद घेत सरकारची बाजू पालक व जनतेपुढे मांडली आहे. पहिली आणि दुसरीमध्ये कोणतेही पुस्तक नसेल, त्यांना भाषेची परीक्षा द्यावी लागणार नाही, तिसरीपासून त्यांना औपचारिकपणे तिसरी भाषा शिकवली जाईल, असे मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, अनेक बाबींचे अभ्यासपूर्ण धोरण ठेवण्यात आले आहे. (पान २ वर)

# अमेरिका भारतीय शेतकऱ्यांना देशोधडीला लावणार?

## कॉर्न आणि सोयाबीनवरील आयात शुल्क कमी करण्याची अमेरिकेची मागणी

**नवी दिल्ली :** कृषी उत्पादनांबरील आयात शुल्कामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार मध्यभागी अडकला आहे. व्यापार करारासाठी, अमेरिका त्यांच्या कॉर्न आणि सोयाबीनसारख्या अनुवांशिकरित्या सुधारित (जीएम मॉडिफाइड) अन्नपदार्थांवरील आयात शुल्क कमी करण्याची मागणी करत आहे. अमेरिकेला वाटते की ही उत्पादने भारतात स्वस्तात विकता येतील. त्याच वेळी, भारतीय सरकार शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याने आयात शुल्क कमी करू इच्छित नाही. जर स्वस्त अमेरिकन जीएम मोडिफाईड अन्न भारतात आले तर भारतीय शेतकऱ्यांचे पीक विकणे कठीण होईल. भारतातील शेतकरी देश व देशोधडीला लागतील. अशा परिस्थितीत, ९ जुलैच्या अंतिम मुदतीपूर्वी तोडगा काढणे कठीण दिसते.





हा भारत आणि अमेरिकेतील व्यापार करार आहे, ज्या अंतर्गत दोन्ही देश एकमेकांच्या वस्तूंवरील आयात शुल्क कमी करून व्यापार वाढवू इच्छितात. भारताला अमेरिकेतील कापड, चामडे, औषधे आणि काही अभियांत्रिकी वस्तूंवर शून्य कर हवा आहे, तर अमेरिकेला त्यांच्या कृषी आणि औद्योगिक उत्पादनांसाठी भारतात बाजारपेठ हवी आहे. हा करार ९ जुलै २०२५ पर्यंत अंतिम होणार होता. जर या तारखेपर्यंत मर्यादित करार झाला नाही, तर अमेरिका भारतीय वस्तूंवर २६ टक्के कर लादू शकते. भारताने जीएम पिकांवर (कॉर्न, सोयाबीन) आणि इतर कृषी उत्पादनांवर आयात शुल्क कमी करावे अशी अमेरिकेची इच्छा आहे. तसेच, वैद्यकीय उपकरणांवरील शुल्क आणि डेटा स्थानिकीकरण नियमांमध्ये शिथिलता हवी आहे. अमेरिका त्याच्या दुग्धजन्य पदार्थांवर, वाहनांवर आणि व्हिस्कीसारख्या वस्तूंवर कमी कर आकारण्याची मागणी देखील करत आहे. भारताने मागण्या मान्य करण्यास नकार दिला, विशेषतः कृषी आणि दुग्ध बाजारपेठ उघडण्याची मागणी. यामुळे लाखो गरीब शेतकऱ्यांचे नुकसान होईल. भारतीय उत्पादने अमेरिकन उत्पादनांशी स्पर्धा करू शकणार नाहीत. जर अमेरिकेने स्टील आणि ऑटोमोबाईल्सवर शुल्क लादले तर आम्हीही प्रत्युत्तरात्मक शुल्क लादू, असे भारताने म्हटले आहे.

### ज्येष्ठ साहित्यिक पठारे यांच्या पंच्याहत्तरी निमित्ताने

## सह्याद्री देवराई सायखिंडीत पंच्याहत्तर वृक्ष लागवड

**संगमनेर :** सह्याद्री देवराई प्रकल्पाला आदरणीय रंगनाथ पठारे सर यांचे मार्गदर्शन व पाठिंबा सतत असतो. त्यांच्या स्वभावानुसार पंच्याहत्तरी साजरी करणे किंवा अशा प्रकारच्या कार्यक्रमाला त्यांची संमती मिळणे जरा कठीण काम. परंतु देवराईत त्यानिमित्ताने वृक्षारोपण होईल व देवराईत काही मित्र जमून गप्पागोष्टी होतील या कारणाने त्यांनी होकार दिला.



ज्येष्ठ साहित्यिक आपल्या संगमनेरकरांचे भूषण ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे हे एक आपल्या सर्वांचे मार्गदर्शक व अनेकांचे उत्तम (पान २ वर)

# नगर-मनमाड रस्त्याचा दशक्रिया विधी, पिंडदान

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर-मनमाड महामार्ग राज्यातील नावाजलेला महामार्ग असून, या मार्गावर नावाजलेली तीर्थक्षेत्रे शिर्डी व श्रीशनिशिंगणापूर आहेत. त्यामुळे या महामार्गावर रात्रंदिवस वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अहिल्यानगरपासून ते कोपरगावपर्यंत या महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी खड्यांचे प्रमाण वाढले आहे. पावसाळ्यामध्ये त्या खड्यात पाणी साचून दुचाकीस्वारांना व चारचाकीस्वारांनासुद्धा या खड्यांचा अंदाज येत नसल्याने अनेक ठिकाणी अपघाताला आमंत्रण मिळते.

गेल्या तीन-चार वर्षात या महामार्गावर अनेक ठिकाणी अपघात होऊन अनेक प्रवाशांचे व ट्याकीस्वारांचे नाहक बळी गेलेले आहेत. राहूरी विद्यापीठ ते राहूरी फॅक्टरीपर्यंत गेल्यावर्षी अपघातांची मालिका दररोज सुरू होती. त्यावेळी त्या अपघातात आठ दिवसांत अकरा प्रवाशांचे बळी गेले होते. त्यावेळी राहुरी तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्रित येऊन राही येथील सुतगिरणीजवळ रस्त्याचा दशक्रियाविधी करून अनेकांनी मुंडन करून या रस्त्याच्या कामासंदर्भात निषेध नोंदविला होता. रस्ता दुरुस्ती कृती समितीच्यावतीने देवेंद्र लांबे, वसंत कदम आदी कार्यकर्त्यांनी त्यावेळी रस्त्याचा दशक्रिया विधी, पिंडदान करून अनेक कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या निषेधार्थ मुंडन केले होते. सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब पवार, शेतकरी संघटनेचे रवींद्र मोरे, सुरेश निमसे, डॉ. रवी घुगरकर, राजेंद्र लोखंडे, सुधाकर आदीक, शरद खांदे, साईनाथ बर्डे, सोमनाथ कीर्तने, आबासाहेब वाळुंज, प्रदीप गरड, अभिजीत आहेर, शरद म्हसे, वैभव गाडे, जयसिंग घाडगे, प्रशांत वाबळे, राजेंद्र बोर्डे, अनिल येवले, दत्ता नागरे या सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी तत्कालीन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना यासंदर्भात निवेदन दिले होते. त्यानंतरही रस्त्याचे काम रेंगाळलेलेच होते. यासंदर्भात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणचे अधिकारी वसंत पंडरकर यांची रस्ता दुरुस्ती कृती समितीचे सदस्य देवेंद्र नामदेव व सतीश घुले यांनी समक्ष भेट घेऊन अहिल्यानगर ते शिर्डी रस्त्याच्या झालेल्या दुर्दशेबद्दल तक्रार केली होती. त्यावेळी त्यांनी खड़े तात्काळ बुजविण्यात येणार असल्याचे सांगितले. रस्ता दुरुस्ती कृती समितीला कुठलेही आंदोलन करण्याची वेळ येऊ देणार नसल्याचे त्यांनी सांगितले त्यामुळे सध्या रस्त्यातील खड्डे बुजून त्यावर मलमपट्टी करण्याचे काम चालू असल्याचे दिसून येत आहे.





### अपघातांचे प्रमाण वाढले

अहिल्यानगर-मनमाड महामार्गावर अनेक निष्पाप बळी गेले आहेत. त्यासंदर्भात अनेक आंदोलने झाली, रास्ता रोको झाले. परंतु या रस्त्याची दुर्दशा काही संपता संपत नाही. या रस्त्यात पावसाळ्यामुळे खड्ड्यांचे प्रमाण वाढलेले आहे. पावसाचे पाणी खड्यांत साचल्यामुळे खड्यांचा अंदाज येत नाही त्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

### ऐन पावसाळ्यात महामार्गाची मलमपट्टी सुरू

३ डिसेंबर २०२२ रोजी रस्ता दुरुस्ती कृती समितीने अहिल्यानगर-मनमाड महामार्गाचा दशक्रिया विधी घालून पिंडदान व अनेक कार्यकर्त्यांनी मुंडन करून प्रशासनाचा निषेध नोंदविला होता. दुसऱ्या छायाचित्रात राहुरी फॅक्टरी ते राहुरीदरम्यान रस्त्याची डागडुजी करून रस्त्याची मलमपट्टी करताना कामगार.

### मंत्री नितीन गडकरींनाही खंत

आतापर्यंत या महामार्गाचे काम करणारे तीन ठेकेदार काम सोडून गेल्याने या रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. काही दिवसापूर्वीच लोणी येथील कार्यक्रमासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आले असता, त्यांनी भाषणात महामार्गाच्या रस्ता दुरुस्तीचा विषय घेतला होता. त्यांनी म्हटले होते की अहिल्यानगर-मनमाड महामार्गाच्या उदघाटनाला यायला मला लाज वाटते.

## प्रकाशक महिलांच्या प्रेरणादायी यशोगाथा

### पुस्तक परिक्षण

'गु टेनबर्गच्या सावल्या' हे प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार लिखित प्रकाशनाच्या व्यवसायात काम करत असलेल्या स्त्रियांच्या योगदानाचे नोंद घेणारे महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. जगाच्या इतिहासामध्ये स्त्रियांना त्यांचे स्थान निर्माण करण्यासाठी, हक्कासाठी, स्वातंत्र्यासाठी स्वतः कंबर कसून उभे रहावे लागले आहे. त्यातून त्यांनी केवळ स्वहित जोपासले असे नाही, तर जगाला स्त्रियांनी केलेल्या कार्याची दखल घ्यावी लागली अत्ता इतिहास रचून ठेवला आहे.

'गुटेनबर्गच्या सावल्या' या पुस्तकामुळे प्रकाशन व्यवसायात स्त्रियांनी केलेली कामगिरी अधोरेखित होते. या पुस्तकाला प्रा. वंदना महाजन यांची प्रस्तावना लाभली आहे. त्या म्हणतात की, ''ज्ञानप्रसाराचे एक माध्यम म्हणून स्त्रिया जेव्हा प्रकाशन व्यवसायाचा विचार करू लागल्या, तेव्हा त्यांना आपल्या दुय्यमत्वाची जाणीव होती आणि या जाणिवेतून जगाला समतेचा विचार देण्यासाठी व स्त्रियांच्या हक्काची, अधिकाराची मांडणी करण्यासाठी या व्यवसायात उतरल्या.'' तसेच प्रस्तावनेत त्यांनी भारतीय मुद्रण कलेसोबत आंतरराष्ट्रीय पातळीवर मुद्रण कलेचा इतिहासही मांडला आहे.




एखाद्या स्त्रीला जेव्हा काही काम सुरू करायचे असते, नवीन विचार मांडायचा असतो किंवा एखादी कृती करायची अत्ते तेक्षा ते सहजपणे होणे शक्य असते, परंतु समाजामध्ये असलेला स्त्री-पुरुष भेदाचा पगडा हे काम सहजनने होऊ देत नाही. परिणामी कुटुंब आणि समाजातून अनेक अडचणी, विरोध आणि नकाराला स्त्रियांना सामोरे जावे लागते. आपल्या देशात स्त्री-पुरुष समतेची पाळेमुळे अजूनही फारशी रुजलेली नाहीत. शिवाय जातीधर्माचा पगडा, चालीरीती, काळ्या गोऱ्या रंगाचा बडेजाव अशा अनेक प्रकारच्या कुप्रथा, चालीरीती या सगळ्यातून आजही स्त्रियांना जावे लागते विविध क्षेत्रांत स्त्रियांनी स्वकर्तृत्वाने आपले नाव कोरले आहे, पण हे नाव कोरण्यापर्यंतचा प्रवास सोपा नसतो. या सगळ्या गोष्टी 'गुटेनबर्गच्या सावल्या' पुस्तकात मांडण्याचा हेतू म्हणजे प्रकाशन व्यवसायात आलेल्या स्त्रियांचा प्रवास असाच काहीसा आहे. प्रत्येकीला स्त्री म्हणून कमी-अधिक फरकाने अडचणी आल्या. या सगळ्या अडचणी आणि पुरुषसत्ताक मानसिकतेवर मात करत प्रकाशक म्हणून स्त्रियांनी त्यांची ओळख निर्माण केली आहे.

'गुटेनबर्गच्या सावल्या'मध्ये पहिली सुरुवात भारताच्या पहिल्या स्त्रीवादी प्रकाशन उर्वशी बुटालिया प्रकाशक महिलांच्या प्रेरणादायी यशोगाथा यांच्यापासून होते. स्त्रीवादी चळवळीला नवी दिशा देणाऱ्या विचारवंत, लेखक आणि काली फॉर विमेन व जुबानच्या त्या प्रकाशक आहेत. जुबानच्या माध्यमातून मदर्स ऑफ मणिपूरसारखे महत्त्वाचे पुस्तक त्यांनी जगासमोर आणले. दुसऱ्या प्रकाशक रितू मेनन ज्या काली फॉर विमेनच्या सहसंस्थापक होत्या. कालांतराने उर्वशी आणि रितू यांनी वेगवेगळ्या स्त्रीवादी प्रकाशन व्यवसायाची सुरुवात केली. रितू मेनन यांच्या कार्याची दखल भारत सरकारने घेत त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव केला.

प्रा. घोडेस्वार यांनी उर्वशी बुटालियापासून ते मधुमिता बर्वेपर्यतच्या स्त्री प्रकाशकांच्या कार्याची नोंद घेतली आहे. प्रामुख्याने महाराष्ट्रातील स्त्री प्रकाशक म्हणून जेव्हा पाहतो तेव्हा सुमती लांडे यांच्यापासून सुरुवात होते. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर अहिल्यानगर (अहमदनगर) सारख्या छोट्या तालुक्यातील प्रकाशन संस्था शब्दालयबद्दल लेखकाने १९८५ च्या दिवाळी अंकाचा अनुभवकथन केला आहे. दिवाळी अंकाचे श्रीधर अंभोरे यांनी रेखाटलेले काळ्या रंगांचे मुखपृष्ठ आणि अंकातील नरहर कुरूंदकर यांचा 'लेगिक स्वातंत्र्याचा प्रश्न' या दोन्ही गोष्टी विचार करायला लावणाऱ्या होत्या. अरुणा सबाने यांनी प्रकाशक म्हणून विदर्भातून सुरुवात केली. अरुणाताईंनी सुरुवात केली त्यावेळी स्त्री प्रकाशक हा शब्दच विदर्भात उदयास आला नव्हता. स्नेहवर्धन प्रकाशनाच्या डॉ. स्नेहल तावरे यांनी १९९० मध्ये सुरू केलेल्या स्नेहवर्धन प्रकाशनाने अनेक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ, समीक्षा ग्रंथांची निर्मिती केली आहे. स्वतः वरची जबाबदारी शांतपणे पार पाडणे हा प्रकाशक म्हणून डॉ. स्नेहल तावरे यांचा गुण आहे. त्यांच्या याच सर्वांगीण कार्याचा परिचय डॉ. घोडेस्वार यांनी करून दिला आहे. मोहिनी कारंडे प्रकाशन व्यवसायात काम करत असताना इतर भाषांमधील साहित्य मराठीमध्ये आणून स्वतःची वेगळी निर्माण छबी केली आहे.

लता गुठे अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील एका छोट्या गावातून आलेल्या, मुंबईत स्थायिक झाल्यानंतर प्रकाशनाच्या व्यवसायात आल्या. भरारी प्रकाशनाच्या माध्यमातून आजपर्यंत त्यांनी २५० पुस्तके प्रकाशित केली आहेत. उत्कृष्ट प्रकाशनासाठी त्यांना ट्रान्स एशियन चेंबर्स ऑफ कॉमर्सचा आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे.

सारिका उबाळे या मराठीतील महत्त्वाच्या कवयित्री आहेत. मुक्ता प्रकाशनाच्या माध्यमातून जात, वर्ग, वर्ग, लिंगभेदाच्या जाणिवा जागृतीसाठी पुस्तके प्रकाशितः करण्याचा त्यांचा संकल्प आहे. याचबरोबर अमृता कुलकर्णी, ज्योती कपिले, चंद्रलेखा दिंडे, नम्रता मुळे अशा अनेक स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाची दखल डॉ. घोडेत्वार यांनी पुस्तकात घेतली आहे. हे पुस्तक प्रकाशन व्यवसायात स्त्रियांचे योगदान नोंदविणारे महत्त्वाचा दस्तावेज आहे.

**गुटेनबर्गच्या सावल्या**
**प्रकाशक :** भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर
पृष्ठ संख्या : ११४
**किंमत : रु. २००/-**

पान १ वरून

### हिंदीविरोधात ५ जुलैला भव्य मोर्चा

तर राज्यभरात शासन निर्णयाची होळी करत निषेध व्यक्त करण्याचा सूचना उद्धव ठाकरे यांनी दिल्या आहेत.

हिंदीसक्तीविरोधात पाच जुलैला होणाऱ्या मोर्चात सहभागी होण्यासाठी मनसेकडून सामान्य मुंबईकरांना हाक दिली जाणार आहे. मनसेकडून मुंबईची लाईफ लाईन असलेल्या लोकल ट्रेनमध्ये जाऊन मुंबईकरांना आवाहन केलं जाईल. आज दुपारी १२ वाजता मनसे नेते संदीप देशपांडे दादर स्थानकात जाऊन प्रवाशांना आवाहन करणार आहेत. लोकलने प्रवास करणाऱ्यांनीही या मोर्चात सहभागी व्हावं असं आवाहन मनसेनं केलंय.

### अजित पवारांच्या निलकंठेश्वर पॅनेलला एकहाती सत्ता

निळकंठेश्वर पॅनलच्या उमेदवारांनी पहिल्या फेरीपासूनच आघाडी धरली. मध्यरात्रीच्या वेळी सांगवी गटातून चंद्रराव तावरे, रणजीत खलाटे यांनी आघाडी घेतली आणि सहकार पॅनलचे उमेदवार चार या संख्येवर आले. मागील पंचवार्षिक निवडणुकीत विरोधी उमेदवारांची विरोधी संचालकांची हीच संख्या होती. त्यामुळे हे संचालक पुन्हा निवडून येणार की काय? अशी शक्यता निर्माण झाली होती. परंतु राष्ट्रवादीचे प्राबल्य असलेल्या निरावागज, खांडज, शिरवली आणि बारामती गटात मात्र राष्ट्रवादीच्या पॅनेलने पुन्हा उचल खाल्ली आणि राष्ट्रवादीच्या नीलकंठेश्वर पॅनलचे उमेदवार मोठ्या फरकाने आघाडीवर राहिले. हीच आघाडी कायम राखत इतर मागास प्रवर्ग भटक्या विमुक्त जाती जमाती व अनुसूचित जाती जमातीचे उमेदवार १००० ते २२०० या मतांच्या फरकाने विजयी झाले. यादरम्यानच्या काळात काल पासून पहिल्या फेरीत सहकार बचावच्या महिला प्रवर्गातील उमेदवार राजश्री कोकरे यांनी आघाडी घेतली होती. या ठिकाणी राष्ट्रवादीच्या निळकंठेश्वर पॅनलच्या उमेदवार ज्योती मुलमुले या पिछाडीवर होत्या. मात्र ज्यावेळी पहाटे पुन्हा मतमोजणीला सुरुवात झाली आणि दुसरी फेरी सुरू झाली तेव्हा ज्योती मुलमुले यांनी पुन्हा आघाडी घेत आपली पिछाडी भरून काढली आणि त्या विजयी झाल्या! सांगवी गटाचा अपवाद वगळता इतर सर्व गटांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे निळकंठेश्वर पॅनलचे उमेदवार आघाडीवर राहिले आणि हीच आघाडी त्यांनी दुसऱ्या फेरीतही कायम राखली. एकूणच निवडणुकीच्या पूर्वीचे वातावरण ज्या पद्धतीचे होते ते पाहून कोणीही चंद्रराव तावरे यांचेच पॅनल विजय होणार असे छातीठोकपणे सांगू शकला असता. परंतु पराभवाचे विजयात रूपांतर कसे करावे ? हे अजित पवारांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना पुन्हा एकदा शिकवले.

### शक्तीपीठ महामार्गासाठीच्या भूसंपादनाला मंजुरी

शक्तीपीठ महामार्ग हा देशातील सर्वात मोठ्या रस्ते पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी आहे. या प्रकल्पासाठी जास्त दराने कर्ज घेण्याबाबत प्रश्न उपस्थित करत, या नोटमध्ये राज्याच्या आर्थिक स्थितीकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. मेगा प्रकल्पांसाठी राज्य सरकारच्या (बीओटी) धोरणाचा पुनर्विचार करण्याचा आणि उपलब्ध आर्थिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यामुळे आता यावर महायुती सरकारमधील नेते काय बोलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. शक्तिपीठ महामार्गासाठी वित्त विभागाकडून कोणताही आक्षेप घेण्यात आलेला नाही. जेव्हा एखादा महामार्ग बांधला जातो, त्यावेळी तो अर्थव्यवस्थेसाठी दालने उघड असतो आणि त्यामधून विकासाचा मार्ग प्रशस्त होतो. जगभरात देशांकडून पायाभूत सुविधांची कामे ही कर्ज घेऊनच तयार केली जातात, जेव्हा पायाभूत सुविधांसाठी कर्ज घेतले जातात तेव्हा ती उत्तम लक्ष मानले जाते आणि ते अर्थव्यवस्थेला बळकट देणरे असते, समृद्धी महामार्गान सुद्धा असेच चित्र बदलले.

### घरगुती वीजदर २६ टक्के कमी होणार

वीजबिलावरुन मोठा वाद झाला होता. विशेषतः महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोरोना संकटानंतर प्रचंड वीजबिल वाढले होते. यामुळे सर्वसामान्यांना या वीजबिलांचा चटका सोसावा लागला होता. याशिवाय आतादेखील वीजबिलाचे दर तसेच आहेत. या निर्णयामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. वीजग्राहकांसाठी आनंदाची बातमी! राज्याच्या इतिहासात प्रथमच पहिल्यावर्षी १० टक्के आणि टप्प्याटप्प्याने कपात करीत ५ वर्षात २६ टक्के वीजदर कमी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य बीज नियामकः आयोगाने (एमईआरसी) हा निकाल महावितरणच्या याचिकेवर दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. साधारणतः पूर्वीचा काळ पाहिला तर १० टक्के वीजदरवाढीच्या याचिका सादर व्हायच्या. पण, राज्याच्या इतिहासात प्रथमच महावितरणने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली. त्यावरच हा आदेश एमईआरसीने दिला. या आदेशाचा लाभ घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहक आणि व्यावसायिक ग्राहक अशा तिन्ही वर्गवारीत होणार आहे. राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे प्रमाण हे ७० टक्के आहे. त्यांच्यासाठी १० टक्के इतके सर्वाधिक दर कमी होतील.

### तिसरीपासून हिंदीची पुस्तके : दादा भुसे

एखादी तिसरी भाषा बंधनकारक म्हणून सरकारने निर्णय घेतलेला नाही, पालकांना जे योग्य वाटेल ते करायचे आहे. शैक्षणिक धोरणात काही बाबी या राज्य सरकारवर ठेवल्या आहेत, साधारण २ ते ८ वयात मुले भाषा लवकर शिकतात, हे वैज्ञानिकांच मत आहे. राज ठाकरे यांची आम्ही भेट घेतली. १९६७ पासून प्रवास आणि निर्णय आम्ही त्यांना सांगितले, सर्व बाबी आम्ही त्यांच्या समोर ठेवल्या आहेत, वस्तुस्थिती त्यांच्या समोर ठेवली आहे. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी बंधनकारक आहे, यापूर्वीच करण्यात आले आहे, मराठी आपली मातृभाषा, राज्यभाषा आहे. केंद्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे, प्रत्येक भाषेचे महत्व असते. आपण कोणाला कमी लेखत नाही, मराठी भाषेचे महत्त्व किंचितही कमी होऊ शकणार नाही, असे दादा भुसे यांनी म्हटल. पहिली आणि दुसरीमध्ये कोणतेही पुस्तक नसेल, त्यांना भाषेची परीक्षा द्यावी लागणार नाही, तिसरीपासून त्यांना औपचारिकपणे तिसरी भाषा शिकवली जाईल, असे मंत्री दादा भुसे यांनी सांगितले. लहान वयात चित्र दाखवून मौखिक शिक्षण भाषेचे दिले जाते. इयत्ता १ आणि २ साठी मौखिक शिक्षण देतील. पुस्तके शिक्षकांसाठी असतील. राष्ट्रीय शिक्षण धोरणात लिहिल्याप्रमाणे राप्रमाणे ३ ऱ्या इयत्तेपासून मुलांचे तिसऱ्या भाषेबाबत लेखन शिक्षण होणार आहे. मध्यप्रदेश, सिक्कीम अशा राज्यात तिसरीपासून त्रिभाषा सूत्र आहे, आपल्याकडे देखील आनंददायी मौखिक शिक्षण दिले. भारतीय २० ते २२ भाषा आहेत, त्यापैकी विद्यार्थी हवी ती भाषा निवडू शकतील. पण, २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सांगितले तरच शिक्षक ती भाषा शिकवतील. अन्य मुलांना इ-प्रणालीचा चापर करून आम्ही शिक्षण देऊ. महाराष्ट्रात गेल्या ३०-४० वर्षापासून वेगवेगळ्या भाषेच्या शाळा सुरू आहेत. राज्यात १,०८ ७५७ शाळांची संख्या आहे, २ कोटी ११ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे. मराठी भाषेच्या शाळा ८५ हजारांपेक्षा जास्त तर १ कोटी ४७ पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे. १५ हजारापेक्षा जास्त इंग्रजी शाळा आहेत, अशी माहितीही दादा भुसेंनी दिली. जाणार आहे, असे दादा भुसे यांनी सांगितले. मराठी भाषेच्या शाळेत पाचवीपासून हिंदी शिकवली जाते आहे. आता टप्प्याने पहिलीपासून इंग्रजी शिकवली जात आहे. जी पुस्तके आहेत ती आधीपासून बाजारात आलेली आहेत, नवीन निर्णयानुसार नवीन पुस्तके आली नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

### सह्याद्री देवराई सायखिंडीत पंच्याहत्तर वृक्ष लागवड

मित्र आहेत. सह्याद्री देवराई महाराष्ट्र भर काम करते. ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे व अनेक पर्यावरण तज्ञ मिळून महाराष्ट्रात चाळीस ठिकाणी चाळीस देवराया नव्याने, अत्यंत नियोजित पद्धतीने उभ्या राहिल्या आहेत. आपल्या संगमनेर तालुक्यात सायखिंडी या अत्यंत दुष्काळी व अवर्षण प्रवण क्षेत्र असलेल्या गावात देवराई आहे. गेली बारा वर्ष या ठिकाणी एक एक झाड लावण्याचा व ते जगवण्याचा प्रयत्न केला जातो आहे. लोकपंचायत संस्थेने या ठिकाणी माती आडवा पाणी जिरवा या कामाला सुरुवात केली. त्यानंतर हा प्रकल्प उभा राहिला आहे. खरे तर २०११-१२ मध्ये त्या ठिकाणी खुरटे झाड देखील नव्हतं. इतकं उजाड आणि भकास हा परिसर होता. आता या ठिकाणी लाखापेक्षा जास्त झाडे दिमाखाने उभी आहेत. केवळ झाडेच नाही तर या ठिकाणी एक पर्यावरणाची साखळीच निर्माण झाली आहे. नानाविध पक्षी, वन्यजीव सहजपणे या ठिकाणी बागडतात. त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची उन्हाळ्यात व्यवस्था करण्यात आली आहे. निर्माण झालेली देवराई म्हणजे एक अनोखे व अत्यंत रमणीय ठिकाण झाले आहे. प्रचंड मेहनत व संयम यासाठी ठेवावा लागला आहे. गेल्याच उन्हाळ्यात मोठा वणवा या ठिकाणी लागला. झालेल्या नुकसानातून परत झाडे उभे राहत आहेत. हे सगळंच मोठं मजेशीर व अत्यंत आनंददायी आहे. दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी दहा वाजता सह्याद्री देवराई सायखिंडी या ठिकाणी आपण या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी यावे, सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी रंगनाथ पठारे सर, प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे, लेखक, चित्रपट कथालेखक, अरविंद जगताप व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# नऊ वाळूतस्करांच्या मुसक्या आवळल्या

## ७५ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त । उपअधीक्षक संतोष खाडे यांची कारवाई



**नेवासा :** तालुक्यातील गोधेगाव येथे वाळूचा अवैध उपसा करुन वाहतूक करणाऱ्या नऊ आरोपींविरुध्द जिल्हा पोलीस पथकाने कारवाई करत ७५ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी विशेष पथक तयार करुन जिल्हयामध्ये अवैद्य धंद्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करून वाळूतस्करांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत.

### पोलीस अधीक्षक घार्गे यांचे आदेश

पोलीस सूत्रांकडून याबाबत मिळालेली माहिती अशी, संतोष खाडे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की नेवासा तालुक्यातील गोधेगावच्या शिवारात गोदावरी नदीच्या पात्रामध्ये काही इसम अवैधरित्या विनापरवाना बेकायदा चोरुन वाळूचा उपसा करुन तिची वाहतूक करत आहेत. तात्काळ नेवासा पोलीस स्टेशनचे कर्मचारी स्टाफ व पंचांना समक्ष बोलावून छापा टाकण्यासाठी हजर रहा असे कळवून विशेष पथक तेथे पोहचले. तेथे काही इसम जेसीबीच्या सहाय्याने गोदावरी नदीपात्रातून वाळूचा उपसा करुन ती उपसलेली वाळू टॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये भरुन इतर ठिकाणी वाहतूक करण्यासाठी नेत असल्याचे दिसून आले. पथकाची चाहूल लागताच ते इसम वाहनासह पळून जाऊ लागले. त्यातील काहीजणांना पाठलाग करुन पकडले.

विश्वासात घेऊन त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे प्रवीण नामदेव म्हस्के (रा. नेवासा खुर्द, ता. नेवासा), विशाल दत्तात्रय ठोंबरे (वय २३ वर्षे, रा. गोधेगाव ता. नेवासा) (जेसीबी चालक मालक), अभिषेक भीमराज जाधव (वय २३ वर्षे, रा. गोधेगाव ता. नेवासा (वाळू भरुन देणारा) असे असल्याचे सांगितले. त्यांच्यासह १ जेसीबी, ५ वाळूने भरलेले ट्रॅक्टर ट्रॉली व १ वाळू भरण्यासाठी थांबलेला ट्रॅक्टर असे एकूण ६ ट्रॅक्टर ५ ब्रॉस वाळूसह मिळून आले. या सर्वांची किंमत ७५ लाख ८० हजार रुपये आहे.

पळून गेलेल्या ट्रॅक्टर चालक-मालकांबाबत विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांची नावे राजेंद्र गोलांडे (रा. गोधेगाव), दिलीप शेलार (रा. गोधेगाव) कृष्णा पुनमसिंग परदेशी (रा. नेवासा खुर्दः कल्याण उन्हाळे (रा. प्रवरासंगम) काका पठारे (रा.धामोरी) अशी असल्याचे सांगितले.

याबाबत नेवासा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे, राजेंद्र वाघ, शकील शेख, शंकर चौधरी, अजय साठे, दिगंबर कारखिले, मल्लिकार्जुन बनकर, उमेश खेडकर, अरविंद भिंगारदिवे, दिनेश मोरे, सुनील दिघे, अमोल कांबळे, विजय ढाकणे, दिपक जाधव, जालिंदर दहिफळे यांचे पथकाने ही कारवाई केली.

## पाकिस्तानमध्ये पुन्हा आत्मघातकी हल्ला

**पुणे ।** पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वा प्रांतात उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एक भीषण हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानी सैनिकांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यात आलं आहे. या आत्मघातकी बॉम्बस्फोटात तब्बल १३ सैनिक ठार झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. या हल्ल्यात सुमारे १९ नागरिक जखमी झाल्याचेही सांगण्यात येत आहे.

# इस्त्रायलचा लेबनॉनवर हल्ला

**नवी दिल्ली :** इराण - इस्त्रायल यांच्यातील युद्ध संपून अवघे चार दिवस उलटले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा करत इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष थांबवला. दोन्ही देशांमध्ये १२ दिवस युद्ध चाललं. इराणविरुद्धचा संघर्ष थांबून अवघे ४ दिवस उलटलेले असताना आता इस्त्रायलनं लेबनॉनवर हल्ला केला आहे. दक्षिण लेबनॉनच्या डोंगराळ भागांवर इस्त्रायलनं मोठ्या प्रमाणात बॉम्बफेक केलेली आहे. हिजबुल्लाहच्या मालमत्तांना लक्ष्य करण्यासाठी इस्त्रायलनं हल्ले केले आहेत. इराणसोबतचा संघर्ष थांबताच इस्त्रायलनं हिजबुल्लाहवरील हल्ले अधिक तीव्र केले आहेत.

लेबनॉनच्या सरकारी राष्ट्रीय वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, नाबातियेहच्या डोंगरांवर दोनदा हवाई हल्ले करण्यात आले.

# एमपीएससी भरती प्रक्रियेकरिता पर्सेंटाईल पद्धती लागू

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) स्पर्धा फीक्षा प्रमाणेच इतर सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी आता गुणांकणाची किमान पर्मेंटाईल पद्धती लागू करण्यात आली आहे. यासंदर्भात लोकसेवा आयोगाने परिपत्रक जाहीर केले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा पोलीस उपनिरीक्षक अशा विविध परीक्षांसह सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये ग्रुप क पदांचा समावेश असतो. आयोगाने त्याच्या परिपत्रकांनुसार वापुढे स्पर्धा परीक्षेप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियेकरिता किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागू करण्यात आला आहे.

आयोगाच्या कार्य नियमावलीतील नियम क्रमांक ८ (ळि) संदर्भात दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजीच्या सुधारणेसह स्पर्धा परीक्षांप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियांकरीता घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षांसाठी देखील किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागू करण्याचा निर्णय आयोगामार्फत घेण्यात आला आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच, सदर निर्णय आयोगाकडुन यापुढे घेण्यात येणा-या चाळणी परीक्षांना लागू असेल पर्सेंटाईल ही प्रणाली उमेदवाराच्या गुणांची तुलना इतर सर्व उमेदवारांच्या गुणांशी करते आणि त्या उमेदवाराने किती टक्के उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे हे दर्शवते.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं ६ नियम बदलले

मुंबइ : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं पुरुष क्रिकेटमधील ६ नियम बदलले आहेत. यामुळं क्रिकेट अधिक वेगवान, निष्पक्ष आणि रोमांचक होण्यात मदत होणार आहे. कसोटी क्रिकेटमधील नियम २०२५-२७ या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेपासून लागू केले जाणार आहेत. एकदिवसीय क्रिकेट आणि टी २० क्रिकेटमधील नियम २ जुलै २०२५ पासून लागू करण्यात आलेले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये स्टॉप क्लॉक नियम : आयसीसीनं कसोटी क्रिकेटमध्ये स्टॉप क्लॉक नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नियमानुसार कसोटी क्रिकेटमध्ये फील्डिंग करणाऱ्या टीमनं ६० सेकंदापेक्षा जास्त वेळ ओव्हर सुरु करण्यास लावल्यास पहिल्यांदा दोन वेळा वॉर्निंग दिली जाणार आहे. त्यानंतर नियमाचा भंग केल्यास त्या संघाच्या ५ धावा वजा केल्या जाणार आहेत. टी २० क्रिकेट आणि वनडे क्रिकेटमध्ये नियम एक वर्षापूर्वीपासून लागू केलेला आहे. आयसीसीनं कसोटी, वनडे आणि टी २० क्रिकेटमधील शॉर्ट रनचा नियम बदलला आहे. जाणीवपूर्वक शॉर्ट रन घेतल्यास पहिल्यांदा ५ धावांचा दंड लावला जायचा. आता फलंदाजानं अतिरिक्त रन घेण्यासाठी जाणीवपूर्वक पहिली रन पूर्ण न केल्यास अम्पायर फील्डिंग करणाऱ्या संघाला स्ट्राइकवर कोणता खेळाडू पाहिजे असं विचारतील. ५ धावांचा नियम देखील लागू असेल. एखाद्या गोलंदाजानं बॉलवर सलाइवा (लाळ) लावल्यास बंदी कायम राहील. चुकून सलाइवा लावल्यास बॉल बदलनं अनिवार्य नसेल. बॉलच्या रचनेत बदल झाल्यास किंवा बॉल खूप ओला झाल्यानं त्याच्यावरील चमक वाढल्यास अम्पायर बॉल बदलण्याचा निर्णय घेऊ शकतात. बॉलमध्ये फार बदल झाला नसेल तर तर तो बदलला जाणार नाही. हे नियम कसोटी, वनडे आणि टी २० क्रिकेटसाठी लागू असतील. आयसीसीनं कॅचच्या नियमात देखील बदल केले आहेत. जर कॅच आऊटच्या रिव्यूमध्ये तो चुकीचा ठरल्यास आणि बॉल पॅडवर लागल्यास टीव्ही अम्पायर एलबीडब्ल्यू फलंदाज आऊट आहे का ते पाहतील. हा नियम कसोटी, टी २० आणि वनडे मध्ये लागू असेल. पंचांनी सॉफ्ट सिग्नल रिव्यू घेतल्यास आणि नो बॉलवर कॅच योग्य असल्यास फलंदाजी करणाऱ्या टीमला नो बॉलची एक रन अतिरिक्त मिळेल. कॅच योग्य नसल्यास नो बॉलची एक रन आणि फलंदाज जितक्या रन धावतील त्यांना त्या धावा मिळतील. पहिल्यांदा कॅचसंदर्भात संशय असल्यास मैदानावरील पंच थर्ड अम्पायरकडे दाद मागायचे. त्यावेळी टीव्ही अम्पायर नो बॉल होता की नव्हता हे सांगायचे, कॅचची तपासणी करत नव्हते. आता त्याची तपासणी केली जाईल.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021